# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका एक—विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण**

रविवार, दिनांक २४ जून, २०१८

[**वेळ** : सकाळी १०.३० ते दुपारी १.००]

(**एकूण गुण** : १००)

---

**सूचना** :- प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

**गुण**

**प्रश्न क्र.१** पुढील उतारा वाचून खालील प्रश्नांची उत्तर लिहा. **१०**

ऑलिंपिक गावाकडे आमची मोटार भरधाव वेगाने जात होती. गर्दी प्रचंड असली तरी रहदारीला अडचण मुळीच नव्हती. येण्याजाण्यासाठी वेगवेगळे रस्ते होते. खेळांचे मैदान जवळ येऊ लागले, तसे आमचे डोळे समोरील क्षितिजाकडे लागले. खूपच उंच अशा स्तंभावर एक भला मोठा ध्वज फडफडत असलेला आम्हांला दिसला. ऑलिंपिक सामन्यांचे ते स्वतंत्र निशाण होते. ध्वजावरील पांढऱ्याशुभ्र पार्श्वभूमीवर लाल, पिवळया, निळया, हिरव्या व काळया रंगांची वर्तुळे एकमेकांत गुंफलेली होती. जणू पाच मित्रच हातांत हात घालून आपल्या मैत्रीची साक्ष जगाला देत होते ! ही पाच वर्तुळे म्हणजे जगातील पाच खंड आणि त्यांची शुभ्रधवल पार्श्वभूमी म्हणजे विशाल अंतराळ. या ध्वजावर ऑलिंपिकचे ब्रीद वाक्य लिहिलेले आहे.- "सिटीयस, ऑल्टियस, फॉर्टियस." म्हणजे गतीमानता, उच्चता, तेजस्विता. प्रत्येक खेळाडूने जास्तीत जास्त गतिमान होण्याचा प्रयत्न केला पाहिजे; अधिकाधिक उंची गाठण्याची शिकस्त केली पाहिजे आणि बलवर्धनासाठी जास्तीत जास्त श्रम केले पाहिजे, असा संदेश हा ध्वज खेळाडूंना देत असतो. या ध्वजस्तंभाजवळ एक स्फूर्तीदायक मशाल सतत तेवत असते. ऑलिंपिक सामने म्हणजे क्रीडापटूंसाठी आणि क्रीडाशौकिनांसाठी एक पर्वणीच असते. पृथ्वीच्या पाठीवरील सर्व राष्ट्रांतील सुमारे पाच ते सहा हजार खेळाडू या सामन्यांमध्ये भाग घेतात. स्त्री — खेळाडूंची ही संख्या दोन हजारांच्या आसपास असते. प्रेक्षागारात सुमारे सत्तर ते ऐंशी हजार प्रेक्षक बसण्याची सोय असते. याशिवाय सुमारे पंचवीस हजार लोकांना हे सामने उभे राहून पाहता येतात. पोहण्याच्या शर्यतीसाठी चार-पाच तलावही बांधलेले असतात.

(अ) ऑलिंपिकच्या ध्वजाचे वर्णन लेखकाने कशाप्रकारे केले आहे ?

(ब) ऑलिंपिकच्या प्रेक्षागाराची बैठक व्यवस्था / रचना कशाप्रकारची आहे ?

(क) प्रस्तुत उताऱ्यांमध्ये ऑलिंपिक गावचे वर्णन कशाप्रकारे आलेले आहे ?

(ड) ऑलिंपिक ध्वजावर असलेल्या प्रत्येक ब्रीदवाक्याचा कोणता अर्थ आहे ?

(इ) ऑलिंपिकचा ध्वज खेळाडूंना कोणता संदेश देतो ?

गुण

**प्रश्न क्र.२** (अ) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. १०

(१) आस लागणे (२) मनाला चाटून जाणे

(३) आटापीटा करणे (४) धाय मोकलणे

(५) गौरव करणे (६) काबीज करणे

(७) बेभान होणे (८) चलबिचल होणे

(९) धक्का बसणे (१०) ऱ्हास होणे

(ब) पुढील समानार्थी शब्दांची योग्य जुळणी करा. १०

| | गट **'अ'** | | गट **'ब'** |
|---|---|---|---|
| (१) | सवंगडी | -- | (अ) शासन |
| (२) | सरकार | -- | (ब) उत्साह |
| (३) | आई | -- | (क) बांगडी |
| (४) | प्रांत | -- | (ड) मस्करी |
| (५) | भारदस्त -- | | (इ) जननी |
| (६) | गवई | -- | (फ) मित्र |
| (७) | स्फूर्ती | -- | (ग) रेघ |
| (८) | कंकण | -- | (ह) क्षेत्र |
| (९) | थट्टा | -- | (य) मजबूत |
| (१०) | रेषा | -- | (र) गायक |

**प्रश्न क्र.३** पाठांच्या आधारे पुढीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा. २०

(अ) काझीरंगा अभयारण्याच्या जंगल सफरीचे वर्णन 'काझीरंगा' यापाठाच्या आधारे स्पष्ट करा.

(ब) 'दिव्याच्या शोधामागाचे दिव्य' या पाठामध्ये एडिसनने दिव्याच्या प्रयोगासाठी कोणकोणते प्रयत्न केले ?

(क) लेखक राजन गवस यांना सखू आजीशी बोलताना अवर्णनीय आनंद का वाटतो ?

(ड) 'व्हेनीस हे एकमेव पाण्यातील शहरआहे' हे व्हेनीस या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

(इ) 'कुलूप' या पाठामध्ये बंडू नानांनी कोणकोणत्या कुलूपांचा प्रयोग केला ?

(ई) 'आभाळातल्या पाऊलवाटा' या पाठाच्या आधारे पक्ष्यांच्या स्थलांतरामागील कारणे लिहा.

(उ) झाडांच्या आसपास कोणाकोणाचे वास्तव्य असल्याचे लेखक भारत सासणे यांनी नमूद केले आहे ?

गुण

प्रश्न क्र.४ 'बेटा मी ऐकतो आहे' या पाठाच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- १०

(अ) शिरीषची कोणती अट लेखकांनी मान्य केली ?

(ब) लेखकाच्या विद्यालयाची काय प्रथा होती ?

(क) कोणत्या विचाराने शिरीषने व्हायोलिन वादन सुरू ठेवले होते ?

(ड) चोवीस तास व्हायोलिन वादनाचा ध्यास घेतलेल्या शिरीषला कोणता भास होई ?

(इ) शिरीष आत येताच लेखकाने त्याला कोणता प्रश्न विचारला ?

**किंवा**

'ते जीवनदायी झाड' या पाठाच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. १०

(अ) लेखकाला लिंबाचे झाड जीवनदायी का वाटले ?

(ब) लेखकाचा व लहान मुलांचा कौतुकाचा कार्यक्रम कोणता होता ?

(क) लेखकाला झाडाखाली गोगलगाईची वस्ती असल्याचे कसे लक्षात आले ?

(ड) लेखकाच्या मते कोण आनंदी राहतात व कोण आनंदापासून वंचित राहतात ?

(इ) लेखकाला खिडकी लावून घ्यावी असे का वाटले असावे ?

प्रश्न क्र.५ 'उजाड उघडे माळरानही' व 'पुन्हा एकदा' या कवितांच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) वसंत ऋतुच्या आगमनाने सृष्टीत कोणकोणते बदल झाले ते कवितेच्या आधारे लिहा. ५

(ब) नवनिर्मितीचा ध्यास 'पुन्हा एकदा' या कवितेतून प्रतिमा इंगोले यांनी कसा मांडला आहे ? ५

**किंवा**

'भेटी लागी जिवा' आणि 'तिफन' या कवितांच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) 'भेटी लागी जिवा' या अंभगातून संत तुकारामांनी विठ्ठल भेटीची ओढ कशी व्यक्त केली आहे ते लिहा. ५

(ब) पावसाच्या आगमनाने शेतकऱ्यांच्या होणाऱ्या लगबगीचे वर्णन 'तिफन' या कवितेत कसे आले आहे ते लिहा. ५

प्रश्न क्र.६ (अ) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** इंग्रजी शब्दांसाठी मराठी पर्यायी शब्द लिहा. ५

(१) Event (२) Handbill

(३) Refreshment (४) Action

(५) Comedy (६) Dismiss

(७) Goodwill (८) Lyric

(९) Humanism (१०) Official Record

गुण

(ब) पुढील इंग्रजी प्रश्नांची उत्तरे मराठीत पूर्ण वाक्यात लिहा. ५

(१) Who is your favourite actor?

(२) Do you like music?

(३) What is your favourite dish?

(४) Who is your role model?

(५) Are you like playing?

(क) पुढील अंक अक्षरात लिहा :- ५

(१) १०– ७ = ३

(२) १२+ १० = २२

(३) ३५÷ ५ = ७

(४) ५०%

(५) ३× १० = ३०

(ड) पुढीलपैकी **पाच** शब्दांचा अर्थपूर्ण वाक्यात उपयोग करा. ५

(१) प्रगती (२) व्यायाम

(३) भीती (४) नेहमी

(५) दरवर्षी (६) शिस्त

(७) प्रतीक

**प्रश्न क्र.७** (अ) पुढील शब्दांचे लिंग बदला. ३

(१) मित्र

(२) स्त्री

(३) आजी

(ब) पुढील शब्दांचे वचन बदला. ३

(१) पडदे

(२) नगर

(३) सामना

(क) पुढील वाक्यांपुढे दिलेल्या क्रियापदांची योग्य रूपे वापरून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही **चार**) ४

(१) आजकाल तो वरचेवर घरी (येणे)

(२) हल्ली जेवण झाल्यावर मी शतपावली (करणे)

(३) मी ताडकन उभा (राहणे)

(४) मला गाण्याची फार आवड (असणे)

(५) आजी कुठे (जाणे?)

(६) माणसे त्या झाडांकडे आकर्षित (होणे)

-*-*-*-*-*-*-

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा
## प्रश्नपत्रिका दोन - सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक -२४ जून, २०१८.
(वेळ : दुपारी १.४५ ते सायंकाळी ४.३०)
(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)
(एकूण गुण १००)

---

सूचना:- प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत. गुण

प्रश्न १: पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे २० ओळींत निबंध लिहा. २०

अ) राजकारणात अडकलेला सामान्य माणूस.
ब) आरोग्य हिच खरी संपत्ती.
क) बेरोजगारी एक समस्या.
ड) भ्रमणध्वनी : किती फायदे ? किती तोटे ?.
इ) आय पी एल : खेळ की खेळाचे अर्थकारण.

प्रश्न २: पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे १५ ते २० ओळीत तुमचे विचार लिहा. २०

अ) पर्यावरणाचा ऱ्हास आणि मानवी भूमिका.
ब) दैनंदिन व्यवहार आणि मातृभाषेचा वापर.
क) वाढत्या शहरीकरणाचे परिणाम.
ड) खेळाचे जीवनातील महत्व.
इ) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या, आणि उपाय.

प्रश्न ३ : पुढीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा. ३०

अ) गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले त्याची भरपाई मिळावी याची मागणी करणाऱ्या आवेदनपत्रावर टिपणी लिहा.

ब) तुमच्या विभागातील कचरा निर्मुलन प्रश्नाबाबत विभागीय पालिका अधिकाऱ्याला पत्र लिहा.

क) अमराठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा परीक्षेसाठी प्रशिक्षण वर्ग सुरु होत असल्याचे निवेदन पत्र तयार करा.

ड) महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये मराठी विषय हा अनिवार्य असावा यासाठी परिपत्रक तयार करा.

कृपया मागे पहा.

प्रश्न ४ : अ) पुढीलपैकी कोणत्याही **दहा** पदनामांसाठी पर्यायी मराठी पदनामे लिहा. १०

१) ACCOUNTANT
२) CHANCELLOR
३) JAILOR
४) LABOUR OFFICER
५) RANGER
६) STATION OFFICER
७) CLAIMS INSPECTOR
८) COMMANDER
९) PERSONAL ASSISTANT
१०) DIVISION COURT
११) MEASURER
१२) FOURTH CLERK

ब) पुढीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा. १०

१) copy forwarded For information And Guidance.

२) Kindly acknowledge The Receipt Of This Letter By Return Of Post.

३) Please,Treat This As Most Urgent.

४) Translate into Marathi.

५) Copy For Information To.

६) Please, Treat This As Strictly confidential.

७) Carry Forword The Balance On The Next Page.

प्रश्न ५) पुढील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. १०

You Are What You Think You Are. You Feel What You Want To Feel. Do You Frequently Hear yourself Saying Or Thinking I Can't ? If You Say Or Think In This Manner, You Will Soon Belive It. It Will Become A Self Fulfilling Prophecy And You Will Feel More powerless And Out Of Control. Adopt Turnaround Mentality. Belive In yourself And Realise That You Are A Capable Person. Give yourself Positive, Encouraging Statements.

-----------------------------